वेळ : २ तास  MN3ACC FYBA Marathi -II  गुण : ६०

प्रश्न. १ ''कविता शतकाची'' या काव्यसंग्रहातील अनेक कविता माणसाच्या संवदेनशीलतेला आव्हान क़रणाऱ्या आहेत''. तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे चर्चा करा. १५

**किंवा**

मराठी भाषा आणि मराठी संस्कृती याविषयाचा स्वाभिमान कवींनीं कसा व्यक्त केला आहे ते 'कविता शतकाची' या काव्यसंग्रहातील तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे स्पष्ट करा.

प्रश्न. २ दलित जीवनातील वास्तव किती दाहक आणि यातनामय आहे याचा प्रत्यय 'कविता शतकाची' या काव्यसंग्रहातील कवितांतून कोणत्या प्रकारे येतो, ते तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे सविस्तर लिहा. १५

**किंवा**

स्वत:च्या अस्तिवाची जाणीव झालेल्या आधुनिक स्त्रीच्या संवेदनशीलतचे दर्शन 'कविता शतकाची' या काव्यसंग्रहातील कवितांतून कसे घडते, ते तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे स्पष्ट करा.

प्रश्न. ३ **खालील सर्व प्रश्न सोडवा.**

**अ)** ठाण्यात नव्याने सुरु होणाऱ्या पंचतारांकित हॉटेलची जाहिरात वर्तमानपत्रासाठी तयार करा. ७

**ब)** मराठा विद्या प्रसारक मंडळ नाशिक या संस्थेच्या वार्षिक सभेचे 'इतिवृत्त' तयार करा. ८

**क)** ठाणे महानगरपालिकेतील वरिष्ठ लिपीक श्री. प्रथमेश देशपांडे यांना त्यांच्या उजव्या डोळयावरील शस्त्रक्रियेसाठी चार दिवसांची भरपगारी रजा हवी आहे. गेली चाळीस वर्षे श्री. प्रथमेश देशपांडे ठाणे महानगरपालिकेच्या सेवेत कायमस्वरुपी आहेत. त्यांची तीस दिवसांची भरपगारी रजा शिल्लक आहे. या माहितीच्या आधारे वरिष्ठांना सादर करावयाची कार्यालयीन टिप्पणी लिहा. ७

**ड) खालील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश लिहा.** ८

ज्ञानासारखे पवित्र या जगामध्ये खरोखरच दुसरे काही नाही. श्रध्दाळू माणसाला ज्ञान प्राप्त होते. माणसाने स्वत:चा उध्दार करावा. त्याने स्वत:ला कधीही अधोगतीला जाऊ देऊ नये. प्रत्येक जण स्वत: स्वत:चाच मित्र आहे. तसा शत्रूही आहे. कल्याण कारक कार्य करणारा मनुष्य कधीही दुर्गतीला जात नाही. परमेश्वराचा भक्त नाश पावत नाही. ज्याला निंदा आणि स्तुती सारखीच वाटते, जो मितभाषी आहे. व जे काही मिळेल त्यात समाधानी राहतो. असा पुरुष परमेश्वराला प्रिय आहे. आपल्या वाटणीला आलेले काम जो मन लावून करतो. त्याला सिध्दी प्रप्त होते. परमेश्वराला सत्कर्मरुपी फुलांची माळ आवडते. ती त्याला घालावी. आपल्या वाटणीला आलेले कर्म प्रामाणिकपणे करणे म्हणजे परमेश्वराची पूजा करणे होय. परमेश्वराची पूजा करणे होय. परमेश्वर सर्व प्राणिमात्रांच्या ह्रदयात राहतो. त्याला संपूर्णपणे शरण गेल्याने तो सर्व पातकापासून आपली मुक्तता करतो.

*****************

वेळ : 2 तास गुण : 60

---

प्र. 1 "लेखकाचा अनुभव आणि त्या अनुभवाचा मुक्त व स्वैर आत्माविष्कार हा ललित लेखनाचा प्राण असतो," सविस्तर चर्चा करा.

किंवा

"आत्मपर आणि समाजपर चिंतन हे ललित लेखनाचे महत्त्वाचे विशेष असतात," सविस्तर परामर्श घ्या. (15)

प्र.2 " 'डोह' च्या परिसरातील व्यक्तिचित्रण लेखकाने अत्यंत मिश्किलपणे केले आहे, " साधार विशद करा.

किंवा

"वालपणीचे अनुभव आपल्या अफाट निरीक्षण शक्तीच्या जोरावर जसेच्या तसे मांडण्यात लेखक कमालीचा यशस्वी झाला आहे," 'डोह' च्या आधारे साधार स्पष्ट करा. (15)

प्र.3 "भावना, अनुभव, आठवणी, आणि विचारांचा अनोखा संगम इंदिरा संतांच्या 'मृदगंध' मधील लेखनात पहायला मिळतो," सविस्तर चिकित्सा करा.

किंवा

" 'मृदगंध' मधील लेखन म्हणजे इंदिरा संतांच्या लेखणीचा एक आगळा-वेगळा, मनोज्ञ आविष्कार आहे," सोदाहरण भाष्य करा. (15)

प्र.4 टीपा लिहा

अ) ललित लेखनातील अनुभवाचे महत्त्व

किंवा

ललित गद्य – एक मुक्त साहित्य प्रकार (5)

व) 'डोह' मधील लेखकाचे वालविश्र्व

किंवा

'डोह' मधील निसर्ग संवेदना (5)

क) 'धरित्रीच्या कविता' मधील आशय

किंवा

'संसार एक आचारसंहिता' मधील आशय (5)